**आर.सी.सी.क्रं. १९७/२०२१**
**<u>नि. ४९</u>**

**सरकारतर्फे सा.क्र. १**

**शपथेवर**

माझे नांव : मंगल संतोष साठे,
वय : ४० वर्षे, धंदा : मजुरी ,
राहणार : देवगाव, ता.नेवासा, जि.अहमदनगर,

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** —

१. घटना ही पाच वर्षापुर्वी दुपारी दीडच्या सुमारास देवगाव स्टॅडवर घडली होती. त्यादिवशी दिवाळीच्या खरेदीला जायचे होते म्हणुन माइया पतीने मला सांगितले होते की, तु मागुन देवगावच्या बस स्टॅडवर ये. माझे पती पुढे गेले होते. मी देवगावच्या बस स्टॅडवर गेले असता तेथे खुप गर्दी पाहिली. मी पाहिले की, जालू चव्हाण आणि वसंत चव्हाण हे दोघे माइया पती संतोषला शिवीगाळ करून मारहाण करीत होते. त्यावेळी जालू चव्हाण याने माइया पतीच्या डोक्यात दगड मारला. त्यामुळे माझे पती बेशुद्ध झाले म्हणुन आम्ही त्यांना बाळु वाल्हेकर यांच्या गाडीतुन कुकाणा पोलीस चौकीत आणले. त्यावेळी पोलीसांनी माइया पतीवर उपचार करण्याकरीता आम्हाला पत्र दिले. त्याप्रमाणे आम्ही त्यांना नेवासा फाटा येथील सरकारी दवाखान्यात उपचाराकरीता आणले. तेथे डॉक्टरांनी माइया पतीला टाके घातले. पुढील उपचाराकरीत नगर येथील सिव्हील हॉस्पीटल येथे जाण्यास सांगितले. सिव्हील हॉस्पीटल येथे त्यांच्यावर दोन दिवस उपचार झाला व पुढील उपचारासाठी त्यांनी आम्हाला नोबेल हॉस्पीटल येथे जाण्यास सांगितले. नोबेल हॉस्पीटल येथे माइया पतीचे ऑपरेशन झाले. त्यानंतर मी नेवासा पोलीस स्टेशनमध्ये आरोपींविरूद्ध फिर्याद दिली. फिर्यादवर मी माझा अंगठा दिला होता. ती फिर्याद आता मला वाचुन दाखविण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ५०** देण्यात येते. ज्या दगडाने माइया पतीस मारहाण झाली तो पाहिल्यास मी ओळखू शकते. आता मला पी. आर. क्र. ६३/२०२३ वरील दगड दाखविण्यात आला. हा तोच दगड आहे ज्याने माइया पतीस मारहाण झाली होती. त्यास मटेरिअल ऑब्जेक्ट क्र. १/२५ देण्यात

येते. दोन्ही आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकते. ते दोघेही देडगावचे राहणार आहेत. **आरोपी क्र. १ व २ आणि त्यांच्या विद्वान विधीज्ञांना वारंवार पुकारले असता ते सर्वजण गैरहजर.**

**सरतपास तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृती**
स्वाक्षरीत/—
दि. १०/११/२०२५ **(लीना अ. काळे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४,नेवासा